सादर दिनांक : ०४-१०-२०२४
नोंदणी दिनांक : ०४-१०-२०२४
निर्णय दिनांक : ०३-०९-२०२६
कालावधी : ०१ वर्ष, ११ महिना, ०० दिवस

कोर्ट विद्यमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर

(पीठासीन अधिकारी श्वेता वि. मोरे पाटील)

ल.मु.नं. २१४/२०२४
निशाणी क्र. ३६

वादी : अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्था मार्यादित
श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.
तर्फे व करिता, व्यवस्थापक
श्री. आण्णासाहेब कचरु जाधव
वय – ५५ व्यवसाय – नोकरी
रा. श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.

विरुद्ध

प्रतिवादी:
१. वंदना आप्पासाहेब राऊत
वय – ४३, धंदा – शेती व दुग्ध व्यवसाय
२. आप्पासाहेब बाजीराव राऊत
वय – ४८, धंदा – शेती व दुग्ध व्यवसाय
३. वैशाली रविंद्र गायधने
वय – ३८, धंदा – शेती
४. अनुराधा शंकर खेडकर
वय – ३८, धंदा – शेती व घरकाम
सर्व रा. मु.पो. निपाणीवडगांव,
ता.श्रीरामपूर जि. अहमदनगर

विवाद : रुपये ३,५४,८७१/- वसुलीसाठी

वादी तर्फे वकील : श्री. बोर्डे आर.पी.

प्रतिवादी क्र. १ व २ : श्री. के.बी. शेख

प्रतिवादी क्र. ३ व ४ : एकतर्फा

न्याय निर्णय

(घोषित दिनांक ०३/०९/२०२६)

१. प्रस्तूतचा विवाद वादी संस्थेने प्रतिवादी कडून संयुक्त आणि स्वतंत्रपणे रक्कम रुपये ३,५४,८७१/- आणि द.सा.द.शे. १६ %भविष्य व्याज खर्चासह वसूल होऊन मिळणे कामी दाखल केला आहे. तसेच वादी संस्थेने विवादातील परिछेद क्र.३ मध्ये नमूद केलेली प्रतिवादी क्र.१ व २ ची मिळकत जप्त आणि विक्री करून येणाऱ्या विक्री उत्पन्नातून वसुली करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे.

२. वादी संस्थेची थोडक्यात केस अशी आहे की, वादी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत संस्था आहे. वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ व २ यास रक्कम रुपये २,००,०००/- चे कर्ज मंजूर करून वाटप केले. सदर कर्जास प्रतिवादी क्र.३ व ४ हे जामीनदार राहिले. प्रतिवादींनी सदर कर्जापोटी वादी संस्थेच्या लाभात वचन चिठ्ठी, लेटर ऑफ कन्टीन्यूटी, करारनामा, के नमुना, वैयक्तिक कर्ज करारनामा, व जामिनकीचा दस्त इत्यादी आवश्यक दस्त करून दिले. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मौजे निपाणीवडगांव ग्रा.प. हद्दीतील मिळकत गट नं. २७/१ पैकी, क्षेत्र ०० हे. ४१ आर या मिळकतीचे वादी संस्थेच्या हक्कामध्ये गहाणखत करून दिले. कर्जाची परतफेड वेळेवर न केल्यास थकीत रक्कमेवर द.सा.द.शे. २ टक्के प्रमाणे दंडव्याज देण्याचे प्रतिवादींनी कबुल केलेले आहे. प्रतिवादीनी ने ठरल्याप्रमाणे कर्ज रकमेची परतफेड केली नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या खाते उताऱ्या नुसार दिनांक ३१/०३/२०२४ अखेर विवाद रक्कम रुपये ३,५४,८७१/- येणे बाकी आहे. वादी संस्थेने प्रतिवादींना अनेक वेळा कर्ज रकमेची परतफेडीची मागणी केली. परंतु, प्रतिवांदीनी कर्जाची परतफेड केली नाही. वादी संस्थेच्या मते विषयांकित कर्ज रकमेची परतफेड सर्व प्रतिवांदीची

A

संयुक्त आणि स्वतंत्र जबाबदारी आहे. वरील सर्व मुद्द्यांच्या आधारावर वादी संस्थेने विवादाचा निवाडा मागणीप्रमाणे तिच्या लाभा मध्ये पारित करावा अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी विवादात हजर झाल्यानंतर निशाणी क्र.१३ वरील आपली कैफियत दाखल करून विवादतील कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ चे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा विवाद कायदेशीर नाही. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सदर दाव्यात वादीने महत्वाच्या बाबी लपवून ठेवल्या आहेत. पतसंस्थेचे वसूली अधिकारी आणसाहेब कचरू जाधव यांना प्रस्तुतचा विवाद दाखल करण्याचे अधिकार नाहीत. प्रतिवादीनी वादी पतसंस्थेकडून घेतलेली कर्जाऊ रक्कम ही वेळेत व सरळव्याज हप्त्याव्दारे परतफेड केली होती व आहे. त्यामुळे प्रतिवादी आता काहीही देणे लागत नाही. प्रतिवादीने भरलेल्या पैशांची नोंद वादीने घेतलेली नाही. वादीने नियमबाह्य व्याजाची आकारणी केलेली आहे. वादीने प्रतिवादीची रक्कम अनामत म्हणून ठेवून घेतलेली आहे. विकल्पेवरुन यदा कदाचित विवाद मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास प्रतिवादींची अर्थिक परिस्थीती चांगली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना समान वार्षिक हप्ते पाडून मिळावेत व व्याजात सवलत मिळावी अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या परस्पर विरोधी कथना वरुन निशाणी क्र.१५ वरील खालील मुद्दे इंग्रजी भाषेत निश्चित केले आहेत. सदर मुद्दे मराठी भाषेत कारणमीमांसे सह पुढील प्रमाणे देण्यात आले आहेत.

अनु. क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	वादी संस्था मागणीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याकडून रक्कम रु. ३,५४,८७१/- द.सा.द.शे. १४ टक्के व्याजदराने संयुक्त व २% प्रमाणे दंडव्याज संयुक्त व स्वतंत्र रित्या मिळण्यास पात्र आहे का?	अंशतः होय
२.	वादी संस्था मागणीप्रमाणे विवादातील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या प्रतिवादी यांची गहाण मिळकतीची जप्ती आणि विक्री करून देय असलेली विवाद कर्ज रक्कम वसूल करून मिळण्यास पात्र आहे का?	होय

A

३.	वादीने वादी संस्थेचे सचिवास वादी संस्थे तर्फे प्रस्तुतचा विवाद दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार व प्राधिकृतात असल्याचे सिद्ध केले का?	होय
४.	प्रस्तुतचा विवाद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९१ नुसार राखण्यास पात्र आहे का?	होय
५.	प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत विवादास महत्वपूर्ण वस्तुस्थिती दडवून ठेवण्याची बाधा येत असल्याचे सिद्ध करतात का?	नाही
६.	प्रतिवादी क्र.१ व २ मागणीप्रमाणे हप्ते मिळण्यास पात्र आहेत काय ?	अंशतः होय
७.	आदेश आणि निवाडा काय?	दावा अंशत: मंजूर करण्यात येतो

कारणमीमांसा

५. प्रस्तुत विवाद सिद्ध करण्यासाठी वादी संस्थेने त्यांच्या तर्फे साक्षीदार श्री. अण्णासाहेब कचरू जाधव यास निशाणी क्र.१६ वरील प्रतिज्ञा लेखाद्वारे तपासले आहे. याशिवाय निशाणी क्र. १७ वरील संचालक मंडळाचा ठराव, निशाणी क्र.१८ वरील कर्ज मागणी अर्ज, निशाणी क्र.१९ वरील कर्ज मंजूरी पत्र, निशाणी २० वरील वचन चिठ्ठी, निशाणी क्र. २१ वरील लेटर ऑफ कंट्यूनिटी, निशाणी क्र. २२ वरील नमुना के, निशाणी क्र. २३ वरील कर्जरोखा, निशाणी क्र.२४ वरील वैयक्तिक कर्ज करारनामा, निशाणी क्र.२५ वरील सहकर्जदाराचे संमती पत्र, निशाणी क्र.२६ व २७ वरील नाममात्र सभासद होण्याकरिता अर्ज, निशाणी क्र.२९ वरील नजरगहाणखत, आणि निशाणी क्र. ३० वरील खाते उतारा दाखल केला आहे. याउलट प्रतिवादी यांना संधी देवूनही त्यांनी पुरावा दाखल केला नाही.

६. वादी तर्फे विद्वान वकील श्री. आर.पी. बोर्डे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रतिवादी १ व २ तर्फे विद्वान वकील श्री. के.बी. शेख यांचा युक्तिवाद ऐकला. आणि प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना वारंवार पुकारले असतं ते युक्तिवादसाठी गैरहजर राहिले.

मुद्दा क्र.१, करिता

७. प्रस्तुत विवादात वादी संस्थेचे असे कथन आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ व २ यास रक्कम रुपये २,००,०००/- चे कर्ज मंजूर करून वाटप केले. सदर कर्जास प्रतिवादी क्र.३ व ४ हे जामीनदार राहिले. प्रतिवादींनी सदर कर्जापोटी वादी संस्थेच्या लाभात वचन चिठ्ठी, वैयक्तिक कर्ज करारनामा, कर्जरोखा/जामीन रोखा आणि ब वर्ग सभासद अर्ज इत्यादी आवश्यक दस्त करून दिले. कर्जाची परतफेड ६० महिन्यात द.सा.द.शे. १४% व्याज दराने करावयाची होती. तसेच कर्जाची परतफेड ठरलेल्या मुदतीत न झाल्यास कर्ज थकल्या पासून द.सा.द.शे. २% जादा व्याज दराने करायचे ठरले होते. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी ठरल्याप्रमाणे कर्ज रकमेची परतफेड केली नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या खाते उताऱ्यानुसार दिनांक ३१/०३/२०२४ अखेर विवाद रक्कम रुपये ३,५४,८७१ /- येणे बाकी आहे. वादी संस्थेने प्रतिवादींना अनेक वेळा कर्ज रकमेची परतफेडीची मागणी केली. परंतु, प्रतिवांदीनी कर्जाची परतफेड केली नाही. वादी संस्थेच्या मते विषयांकित कर्ज रकमेची परतफेड सर्व प्रतिवांदीची संयुक्त आणि स्वतंत्र जबाबदारी आहे. सदर बाब सिद्ध करण्यासाठी वादी संस्थेचा साक्षीदार नामे श्री. अण्णासाहेब कचरू जाधव याने त्याच्या साक्षीच्या प्रतिज्ञा लेखामध्ये विवादातील कथनाचा पुनरुच्चार केला आहे. याशिवाय या साक्षीदाराने निशाणी क्र. १७ वरील संचालक मंडळाचा ठराव, निशाणी क्र.१८ वरील कर्ज मागणी अर्ज, निशाणी क्र.१९ वरील कर्ज मंजूरी पत्र, निशाणी २० वरील वचन चिठ्ठी, निशाणी क्र. २१ वरील लेटर ऑफ कंट्युनिटी, निशाणी क्र. २२ वरील नमुना के, निशाणी क्र. २३ वरील कर्जरोखा, निशाणी क्र.२४ वरील वैयक्तिक कर्ज करारनामा, निशाणी क्र.२५ वरील सहकर्जदाराचे संमती पत्र, निशाणी क्र.२६ ते २७ वरील नाममात्र सभासद होण्याकरिता अर्ज, निशाणी क्र.२९ वरील नजरगहाणखत आणि निशाणी क्र. ३० कडील खाते उतारा सिद्ध केला आहे.

८. ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की **नामदार सर्वोच्च न्यायालय यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया विरुद्ध रवींद्र व इतर AIR 2001 SC 3095** या निवाड्यात परिच्छेद 44 मध्ये खालील प्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे.

> *"44. We are of the opinion that the meaning assigned to the expression "the principal sum adjudged" should continue to be assigned to*

"principal sum" at such other places in Section 34(1) where the expression has been used qualified by the adjective "such", that is to say, as "such principal sum". Recognition of the method of capitalisation of interest so as to make it a part of the principal consistently with the contract between the parties or established banking practice does not offend the sense of reason, justice and equity. As we have noticed, such a system has a long-established practice and a series of judicial precedents upholding the same. Secondly, the underlying principle as noticed in several decided cases is that when interest is debited to the account of the borrower on periodical rests, it is debited because of it having fallen due on that day. Nothing prevents the borrower from paying the amount of interest on the date it falls due. If the amount of interest is paid there will be no occasion for capitalising the amount of interest and converting it into principal. If the interest is not paid on the date due, from that date the creditor is deprived of such use of the money which it would have made if the debtor had paid the amount of interest on the date due. The creditor needs to be compensated for deprivation. As held in Pazhaniappa Mudaliar v. Narayana Ayyar [AIR 1943 Mad 157 : (1942) 2 MLJ 753] the fact situation is analogous to one as if the creditor has advanced money to the borrower equivalent to the amount of interest debited. We are, therefore, of the opinion that the expression "the principal sum adjudged" may include the amount of interest, charged on periodical rests, and capitalised with the principal sum actually advanced, so as to become an amalgam of principal in such cases where it is permissible or obligatory for the court to hold so. Where the principal sum (on the date of suit) has been so adjudged, the same shall be treated as "principal sum" for the purpose of "such principal sum" — the expression employed later in Section 34 CPC. The expression "principal sum" cannot be given different

meanings at different places in the language of same section i.e. Section 34 CPC."

सदर निरीक्षणानुसार व्याजाची रक्कमेची देय दिनांकास परतफेड न झाल्यास ती रक्कम मुद्दल मध्ये समाविष्ट करून त्यावर व्याज घेण्यास वादी संस्था पात्र ठरते.

९. निशाणी क्र.३० कडील खाते उताऱ्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व २ कडुन दिनांक ३१/०३/२०२४ अखेर विवाद रक्कम रुपये ३,५४,८७१/- येणे बाकी असल्याचे दर्शविले आहे. दावा रकमेबाबत वादीचा उपरोक्त तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता खाते उताऱ्यामध्ये वादी संस्थेने इतर खर्च नावाखाली रक्कम रुपये ४००/- प्रतिवादीवर लादले आहेत. परंतु, सदर रक्कम बाबत वादी संस्थेने कोणताही कागदोपत्री पुरावा आधार म्हणून सादर केला नाही. त्यामुळे सदर रक्कम वजाजाता उर्वरित रक्कम रुपये ३,५४,८७१/- वादी संस्थेने शाबीत केले आहेत. तसेच कर्जरोखे आणि वचनचिठ्ठी प्रमाणे वादी संस्था द.सा.द.शे. १४% प्रमाणे दिनांक ०१/०४/२०२४ पासून पुढे व्याज घेण्यास पात्र आहे. परंतु, वादी संस्था दंड व्याज घेण्यास पात्र नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्र.२ करिता</u>

१०. वादी संस्था अशी केस घेऊन आले आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत कर्जाच्या अनुषंगाने विवादातील परिच्छेद मौजे निपाणीवडगांव ग्रा.प. हद्दीतील मिळकत गट नं. २७/१ पैकी, क्षेत्र ०० हे. ४१ आर या मिळकतीचे तिचे हक्कामध्ये गहाणखत करून दिले आहे. सदर बाब सिद्ध करण्यासाठी वादी संस्थेद्वारे निशाणी क्र.२९ वरील मूळ गहाण खत दाखल करण्यात आले आहे. सदर गहाण खताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे गहाण खत नोंदणीकृत दस्त असल्यामुळे सदरचा दस्त योग्यरीत्या अमलात आणला असून त्यास कायद्यानुसार योग्यता प्राप्त होते. सदरच्या गहाण खतामध्ये सदरचा दस्त संपूर्ण कर्जाची रक्कम रुपये २,००,०००/- साठी अमलात आणल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरच्या नोंदणीकृत गहाण खता वरून वादी संस्थेची कर्जाच्या कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी स्वीकारलेल्या कर्ज रक्कमेच्या मोबदल्यात अमलात आणल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे वादी संस्था विवादातील

परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेली मालमत्ता विहित नियमानुसार जप्त आणि विक्री करून त्यातून कर्जाची रक्कम वसूल करू शकते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

मुद्दा क्र. ३ करिता

११. प्रतिवादींनी निशाणी क्र.१३ कडील कैफियती मध्ये वादी संस्थेचे व्यवस्थापक यास प्रस्तुतचा विवाद दाखल करण्यास कायदेशीर अधिकार नाही असे म्हटले आहे. परंतु, प्रस्तुतचा विवाद श्री. आणासाहेब कचरू जाधव यांनी दाखल केला आहे. वादी संस्थेने निशाणी क्र.१७ वरील दाखल केलेल्या ठरावाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी संस्थेत कडून दिनांक २०/०९/२०२४ रोजी ठराव क्र.१२(२) पारित करण्यात आला असून त्याद्वारे प्रस्तुत प्रकरणांमध्ये वादी संस्थेच्या वतीने विवाद दाखल करण्याचा अधिकार श्री. आणासाहेब कचरू जाधव यास आला आहे. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३६ नुसार निगम निकाय संस्था असल्यामुळे तिचा कार्यभार ठराव पारित करून पार पाडला जातो. महत्त्वपूर्ण बाब म्हणजे प्रतिवादींनी निशाणी क्र.१७ कडील ठरावा बाबतचे गृहीतक खोडून काढले नाही. त्यामुळे प्रतिवादींनी घेतलेला वादी संस्थेचे श्री. आणासाहेब कचरू जाधव यास प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा अधिकार नाही हा बचाव ग्राह्य धरण्यास पात्र ठरत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

मुद्दा क्र.४ करिता

१२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र. १३ कडील कैफियती मध्ये प्रस्तुतचा विवाद दाखल होण्यास पात्र नाही अशी हरकत घेतली आहे. महत्त्वपूर्ण बाब म्हणजे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा विवाद दाखल होण्यास का पात्र नाही ही बाब स्पष्ट केली नाही. याशिवाय वादी संस्थाची प्रतिवादींनी संस्थेच्या कर्जाची परतफेड केली नसल्याचे विशिष्ट केस आहे. नि. १८ वरील कर्ज मागणी अर्ज, नि. २४ वरील वैयक्तीक कर्ज करारनामा, व नि. २६ व २७ वरील 'ब' वर्गाचे सभासदत्व मिळणेसंबंधी अर्ज, यावरून प्रतिवादीं हे वादी संस्थेचे सभासद असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९१ नुसार न भरलेल्या देयकाबाबत वादी संस्था प्रतिवादीं विरुद्ध या न्यायालयासमोर विवाद दाखल करू शकते. त्यामुळे प्रस्तुतचा विवाद न्यायालयासमोर बेकायदेशीर रित्या दाखल झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

मुद्दा क्र.५ करिता

१३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.१३ कडील कैफियत मध्ये प्रस्तुत विवादास महत्वपूर्ण वस्तुस्थिती दडवून ठेवण्याची बाधा अशी हरकत घेतली असली तरी वादी संस्थेने कोणती महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती दडवून ठेवली ही बाब स्पष्ट केली नाही. तसेच त्याबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. अशा परिस्थितीमध्ये वादी संस्थेने महत्वपूर्ण वस्तुस्थिती दडवून ठेवण्याची बाब सिद्ध होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

मुद्दा क्र.६ करिता

१४. मुद्दा क्र.६ सिद्ध करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ व २ वर आहे. या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या लेखी कैफियत मध्ये वादी संस्थेच्या कायद्याप्रमाणे देयक असलेल्या रक्कमेचे समान वार्षीक हप्ते व व्याजात सवलत मिळावी अशी मागणी केली आहे. उलटतपासामध्ये वादी संस्थेचा साक्षीदार श्री. आण्णासाहेब कचरु जाधव यांनी प्रतिवादी क्र. १ ची थकीत असलेली रक्कम, जर प्रतिवादी यांची कर्ज परतफेड करण्याची तयारी असेल तर वादी संस्थेमध्ये चर्चा करुन आम्ही हप्ते पाडून देण्यास तयार आहोत असे सांगितले आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञ यांनी देखिल युक्तीवादा दरम्यान प्रतिवादी हे शेतकरी असल्यामुळे त्यांचा दुधाचा व्यवसाय असल्यामुळे एकंदरित सर्व शेतकऱ्यांची अर्थिक परिस्थिती विचारात घेता समान वार्षिक हप्ते पाडून देण्यात यावे अशी विनंती केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ हे देयक असलेल्या रक्कमेचे योग्य ते हप्ते वादी संस्थेकडून पाडून मिळण्यास पात्र आहे. परंतू प्रतिवादी क्र. १ याने व्याजात का सवलत मिळावी ही बाब स्पष्ट केली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.६ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवीत आहे.

उपरोक्त चर्चेवरून मी या निष्कर्षास पोहोचले आहे की, वादी संस्थेने तिची मागणी अंशतः सिद्ध केली आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.७ करिता खालील आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वादी संस्थेचा विवाद खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना आदेशित करण्यात येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ३,५४,८७१/- व त्यावरील मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे. १४% प्रमाणे व्याजदराने दिनांक ०१/०४/२०२४ पासून ते रकमेची पूर्ण परतफेड होईपर्यंत होणारी सर्व रक्कम वादी संस्थेस संयुक्त व स्वतंत्र रित्या परतफेड करावी.

३. वादी संस्थेला आदेशित करण्यात येते की, प्रतिवादी यांना निवाडा रकमेची परतफेड करण्यासाठी योग्य ते हप्ते पाडून देण्यात यावे. वादी संस्थेने पाडून दिलेले हप्ते भरण्यास प्रतिवादी सलग तीन हप्ते फेडण्यास अयशस्वी ठरल्यास वादी संस्था देयक असणारी उर्वरित रक्कम एकरकमी प्रतिवादी कडुन संयुक्त व स्वतंत्रपणे वसूल करण्यास पात्र राहील.

४. वादी संस्थेस विहित अधिनियम व नियमानुसार कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून विवादातील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेली मालमत्ता जप्त आणि विक्री करून त्यातून कर्जाची रक्कम वसूल करण्याची मुभा राहील.

५. प्रतिवादीनी वादी संस्थेस दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

६. येणेप्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.
(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषीत.)

Shweta 03/09/26
(श्वेता वि. मोरे पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

ठिकाण : श्रीरामपूर
दिनांक : ०३/०९/२०२६

निकाल घोषित दिनांक : ०३/०९/२०२६
निकाल तयार दिनांक : ०३/०९/२०२६
निकाल स्वाक्षरी दिनांक : ०३/०९/२०२६

MHSC170002182024 A.B.N.No.214/2024

सादर दिनांक : ०४-१०-२०२४
नोंदणी दिनांक : ०४-१०-२०२४
निर्णय दिनांक : ०३-०९-२०२६
कालावधी : ०१ वर्ष, ११ महिना, ०० दिवस

कोर्ट विद्यमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर

(पीठासीन अधिकारी श्वेता वि. मोरे पाटील)

ल.मु.नं. २१४/२०२४
निशाणी क्र. ३७

वादी : अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्था मार्यादित
श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.
तर्फे व करिता, व्यवस्थापक
श्री. आण्णासाहेब कचरु जाधव
वय – ५५ व्यवसाय – नोकरी
रा. श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.

विरुद्ध

प्रतिवादी:
१. वंदना आप्पासाहेब राऊत
वय – ४३, धंदा – शेती व दुग्ध व्यवसाय
२. आप्पासाहेब बाजीराव राऊत
वय – ४८, धंदा – शेती व दुग्ध व्यवसाय
३. वैशाली रविंद्र गायधने
वय – ३८, धंदा – शेती
४. अनुराधा शंकर खेडकर
वय – ३८, धंदा – शेती व घरकाम
सर्व रा. मु.पो. निपाणीवडगांव,
ता.श्रीरामपूर जि. अहमदनगर

विवाद : रुपये ३,५४,८७१/- वसुलीसाठी

ज्याअर्थी १९६१ चा कायदा कलम २४ चे कलम ९१ अन्वये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन निकाल करण्याचे आहे.

त्याअर्थी मी, श्वेता वि. मोरे पाटील, न्यायाधीश, सहकार न्यायालय, श्रीरामपूर वरील पक्षकारास समन्से करुन आणि दाव्याची योग्य चौकशी अलहिदा नोंदवून ठेवलेल्या कारणावरुन असे कळविते की,

निवाडा

१. वादी संस्थेचा विवाद खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना आदेशित करण्यात येते की, प्रतिवादींनी विवाद रक्कम रुपये ३,५४,८७१/- व त्यावरील मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे. १४% प्रमाणे व्याजदराने दिनांक ०१/०४/२०२४ पासून ते रकमेची पूर्ण परतफेड होईपर्यंत होणारी सर्व रक्कम वादी संस्थेस संयुक्त व स्वतंत्र रित्या परतफेड करावी.

३. वादी संस्थेला आदेशित करण्यात येते की, प्रतिवादी यांना निवाडा रकमेची परतफेड करण्यासाठी योग्य ते हप्ते पाडून देण्यात यावे. वादी संस्थेने पाडून दिलेले हप्ते भरण्यास प्रतिवादी सलग तीन हप्ते फेडण्यास अयशस्वी ठरल्यास वादी संस्था देयक असणारी उर्वरित रक्कम एकरकमी प्रतिवादी कडुन संयुक्त व स्वतंत्रपणे वसूल करण्यास पात्र राहील.

४. वादी संस्थेस विहित अधिनियम व नियमानुसार कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून विवादातील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेली मालमत्ता जप्त आणि विक्री करून त्यातून कर्जाची रक्कम वसूल करण्याची मुभा राहील.

५. प्रतिवादीनी वादी संस्थेस दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

विवाद खर्च

तपशील	कोर्ट फी स्टॅम्प	अनामत (डिपॉझिट)	इतर	एकूण
वादी	७,६००/-	--	--	७,६००/-
प्रतिवादीं	--	--	--	--

Shweta ०३/०९/२६

(श्वेता वि. मोरे पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

ठिकाण : श्रीरामपूर
दिनांक : ०३/०९/२०२६

निकाल घोषित दिनांक : ०३/०९/२०२६
निकाल तयार दिनांक : ०३/०९/२०२६
निकाल स्वाक्षरी दिनांक : ०३/०९/२०२६